**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१००१/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. संतोष कुमार तिवारी**
**सी ०४ न्यु मिरा पैराडाईज, गिता नगर**
**जुना पेट्रोलपंपाच्या मागे, मिरा भाईंदर रोड**
**मिरारोड पूर्व, जि.ठाणे ४०१ १०७**

विरुध्द

| | |
|---|---|
| विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा आयुक्त<br>प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका<br>स्व.विलासराव देशमुख भवन, जांगीड एन्क्लेव्ह, लक्ष्मी पार्क, कनाकिया रोड, मिरारोड पूर्व, जि.ठाणे | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा आयुक्त<br>प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका<br>स्व.विलासराव देशमुख भवन, जांगीड एन्क्लेव्ह, लक्ष्मी पार्क, कनाकिया रोड, मिरारोड पूर्व, जि.ठाणे |

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.१.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.११.२०२१ | —— | २७.१२.२०२१ | ११.१.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२३.३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती दिली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३०.१.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर सुकदेव लेंडवे, सहा. आयुक्त,प्रभाग समिती क्र.४, मिरा भाईंदर महानगरपालिका आणि तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. नरेंद्र चव्हाण, विभाग प्रमुख, मिरा भाईंदर महानगरपालिका हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(प्रभाग क्र. ४ कार्यालय द्वारा दिये गये आदेश पत्र जा.क्र.मनपा/प्र.क्र.०४/अपि/मिपु/११३५/२०२०-२१ दि.१४.२.२०२१ के माध्यम से न्यु मिरा पैराडाईज को-ऑ.हौ.सो.लि.गितानगर, जुना पेट्रोल पंप के पिछे, मिरा-भायंदर रोड, मिरा रोड, पूर्व दिये गये आपके आदेशों मे मांगी गई अटीशर्ती नुसार निम्नलिखित दस्तवेज प्रदान करवाये.)"*

*"(१) अटीशर्ती २ के नुसार बांधकाम का सुस्थिती प्रमाणपत्र की प्रत प्रदान करे. (२) अटीशर्ती ३ के अनुसार बांधकाम मे प्रयोग हुए बांधकाम साहित्य की शासकीय प्रयोग शाला की जांच रिपोर्ट कि प्रत. (३) अटीशर्ती १३ के अनुसार क्षी मोहम्मद शोएब भाटी को दुरुस्ती बांधकाम पर नियुक्ती कर मनपा के दिया गया पत्र. (४) अटीशर्ती १९ के अनुसार बांधकाम मे सोसायटी द्वारा लिया गया शासकीय या निमशासकीय परवानगी कि पत्र. (५) अटीशर्ती २५ के अनुसार बांधकाम नगररचना विभाग से सदर जगह मे संपूर्ण बिल्डिंग छतों पर टीन पतरा डालने का परवानगी पत्र प्रदान करवाये. (६) सदर इमारत मनपा द्वारा अधिकृत है इसका प्रमाणपत्र या सर्टीफिकेट प्रदान करवाये. (७) सदर इमारत मे अबतक हुए सभी अवैध बांधकाम की सुची प्रदान करवाये. (८) इन अवैध बांधकामों को लेकर मनपा प्रभाग कार्यालय ४ द्वारा समय समय पर लिए गये नोटीस मनपा/प्र.क्र.०४/अवि/६०३/२०१९-२० दि.१३.९.१९ समस्त सभी तोडक कार्यवाही के फाईल की संचिका प्रदान करे.)"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "विहित मुदतीत माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, “जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी/प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ४ यांनी अपिलार्थी अर्जदारास अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात यावी.” असा निर्णय दिलेला आहे.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना माहिती पुरविल्याबाबतचा अभिलेख त्यांना आढळून येत नाही. यावरून असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविण्यात आलेली नाही. सबब, तक्रारकर्ता यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आदेश दिल्याप्रमाणे तक्रारकर्ता यांना सदरची माहिती पुढील १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना याच कालावधीत कळविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४, मिरा भाईंदर महागनरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २६.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. **म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१३.३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण खंडपीठ

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० जानेवारी, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त,
प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका,
स्व.विलासराव देशमुख भवन, जांगीड एन्क्लेव्ह, लक्ष्मी पार्क,
कनाकिया रोड, मिरारोड पूर्व, जि.ठाणे

**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर सुकदेव लेंडवे, सहा. आयुक्त,
प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका,
स्व.विलासराव देशमुख भवन, जांगीड एन्क्लेव्ह, लक्ष्मी पार्क,
कनाकिया रोड, मिरारोड पूर्व, जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१००१/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. संतोष कुमार तिवारी**

**सुनावणी दिनांक १३.३.२०२५ (In continuation of order dt. ३०.१.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका या उपस्थित आहेत.

या प्रकरणी आयोगाच्या दि.३०.१.२०२५ रोजीच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता. त्यांनी दि.१०.३.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, तक्रारकर्ता यांनी माहिती मिळणेबाबतचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दाखल केला होता. या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना जा.क्र.मनपा/प्र.क्र.०४/मि.पु/१३१८/२०२२-२३ दि.१०.१.२०२२ अन्वये माहिती बनविण्यात आलेली असून नजरचुकीने संबंधितांस माहिती पुरविण्यात आलेली नव्हती. तद्नंतर दि.८.३.२०२५ रोजी अर्जदारास स्पीड पोस्टाद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर माहिती दिल्याची प्रत त्यांनी सोबत जोडून दिली आहे. तरी या संदर्भात आपणास शास्ती लादण्यात येऊ नये अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या संदर्भात तक्रारकर्ता यांनी असा आक्षेप घेतला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी वर नमूद केलेल्या पत्रात दि.१०.१.२०२२ असा नमूद आहे. याच पत्राच्या संदर्भ क्र.३ मध्ये, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांचेकडील तक्रार क्र.१००१/२०२२ दि.२१.२.२०२५ रोजीची सुनावणीची सूचना या सूचनेचा संदर्भ दिलेला आहे. म्हणजेच दि.१०.१.२०२२ रोजी पाठविलेल्या पत्रावर आयोगाच्या दि.२१.२.२०२५ रोजीच्या सुनावणीच्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे. यावरून हे पत्र आता तयार करण्यात आले असून त्यावर मागील तारीख टाकण्यात आली आहे व खोटा जावक क्रमांक नोंदविलेला आहे दिसून येते.

या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना खुलासा सादर करण्याबाबत विचारणा केली असता त्या या संदर्भात कोणताही खुलासा करू शकल्या नाहीत.

एकूणच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मागील दिनांक टाकून त्याचवेळी माहिती तयार करण्यात आली होती. तथापि, ती नजरचुकीने तक्रारकर्ता यांना देण्याचे राहून गेले आहे असा बनाव करण्याचा प्रयत्न केला आहे. दि.२१.२.२०२५ रोजीच्या सुनावणीच्या सूचनेनंतरच व आयोगाच्या दि.३०.१.२०२५ रोजीच्या आदेशानंतरच त्यांनी तक्रारकर्ता यांना माहिती पुरविली आहे. तथापि, आपणास आयोगातर्फे शास्ती लादण्यात येऊ नये यासाठी त्यांनी मागील तारखेचा खोटा अभिलेख तयार केलेला आहे. असा अभिलेख तयार करताना आपण दि.२१.२.२०२५ रोजीच्या आयोगाच्या सुनावणी सूचनेच्या पत्राचा संदर्भ देत आहोत ही बाब त्यांच्या लक्षात आली नसावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी केवळ तक्रारकर्ता यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला नसून आयोगाचीदेखील दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे असे त्यांच्या लेखी खुलाशावरून स्पष्ट होते. त्यांनी सादर केलेला लेखी खुलासा हा खोटया दस्तावेजांवर आधारीत असल्याने तो अमान्य करणे उचित होईल. त्याचप्रमाणे या प्रकरणी आयोगाने दि.३०.१.२०२५ रोजी, *"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४, मिरा भाईंदर महागनरपालिका यांनी तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे."* असे आदेशित केले होते. तथापि, त्या आदेशाची पूर्तता झाली किंवा कसे याचा लेखी खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी वर नमूद केल्याप्रमाणे खोटी व बनावट कागदपत्रे सादर करून आयोगाची दिशाभूल केली असल्यामुळे, **आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांचेविरूध्द प्रशासकीय कारवाई करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगास पुढील ६ महिन्यांत सादर करणे उचित होईल. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांनी या आदेशाच्या प्रतींसह इतर सर्व कागदपत्रांच्या प्रती आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पाठविणे उचित होईल.** प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुधाकर सुकदेव लेंडवे, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४, मिरा भाईंदर महागनरपालिका यांनी आयोगाच्या दि.३०.१.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.१ अन्वये दिलेल्या आदेशाची पूर्तता केली किंवा कसे **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२९.४.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दि.२६.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून, वर विवेचनामध्ये नमूद केल्याप्रमाणे खोटी व बनावट कागदपत्रे सादर करून आयोगाची दिशाभूल केली असल्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु. २५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ५ मासिक हप्त्यात वसूल करून लेखाशिर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००-इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करून पूर्तता अहवाल **उपायुक्त, (सामान्य प्रशासन विभाग), मिरा भाईंदर महानगरपालिका** यांनी आयोगास सादर करावा.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी वर विवेचनामध्ये नमूद केल्याप्रमाणे खोटी व बनावट कागदपत्रे सादर करून आयोगाची दिशाभूल केली असल्यामुळे, **आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांचेविरूध्द प्रशासकीय कारवाई करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगास पुढील ६ महिन्यांत सादर करावा.**

४. **उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांनी या आदेशाच्या प्रतींसह इतर सर्व कागदपत्रांच्या प्रती आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पाठवाव्यात.**

५. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.४.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ मार्च, २०२५

**आदेशातील मुद्दा क्र. ३ च्या अनुपालनार्थ प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय भाईंदर,**
**स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प), ता. जि. ठाणे ४०१ १०१.**

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना .**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. उप आयुक्त (सा.प्र), सामान्य प्रशासन विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय भाईंदर, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प), ता. जि. ठाणे ४०१ १०१.

४. आहरण व संवितरण अधिकारी/मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय भाईंदर,
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प), ता. जि. ठाणे ४०१ १०१.

५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, सहा. आयुक्त,
प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका,
स्व.विलासराव देशमुख भवन, जांगीड एन्क्लेव्ह, लक्ष्मी पार्क,
कनाकिया रोड, मिरारोड पूर्व, जि.ठाणे
**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर सुकदेव लेंडवे, सहा. आयुक्त,
प्रभाग समिती क्र.०४, मिरा भाईंदर महानगरपालिका,
स्व.विलासराव देशमुख भवन, जांगीड एन्क्लेव्ह, लक्ष्मी पार्क,
कनाकिया रोड, मिरारोड पूर्व, जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग

कोंकण खंडपीठ